**प्रेस रिलीज: 24 नोव्हेंबर 2022**

# फेडरेशन ऑफ मोटर स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (FMSCI) व सुपरकॉस इंडिया प्रा. लि. (SXI) यांमध्ये 'सुपरक्रॉस रेसिंग लीग'च्या आयोजनासाठी सामंजस्य करार

- **ब्रेकिंग- सुपरक्रॉस रेसिंग या खेळासाठी भारताची स्वतःची लीग असेल व जागतिक सहभागाचे दरवाजे उघडतील.**
- **सुपरक्रॉस रेसिंगसाठी भारत एक नवीन स्थान म्हणून नावारूपास येण्याची शक्यता**

**पुणे, २४ नोव्हेंबर**: भारतातील मोटरस्पोर्ट्स, बाइकिंग प्रेमी आणि ऑटोमोबाईल क्षेत्रासाठी एक रोमांचक बातमी आहे.

भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने मान्यताप्राप्त भारतातील मोटरस्पोर्ट्सची प्रशासकीय संस्था **फेडरेशन ऑफ मोटर स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (FMSCI) ने सुपरक्रॉस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (SXI) ला** आज अधिकृतपणे जगातील पहिल्या प्रकारची सुपरक्रॉस रेसिंग लीग सुरू करण्याच्या परवानगी बाबत घोषणा केली. ही नवीन लीग **"इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीग" (ISRL)** या नावाने ओळखली जाईल "

पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत हा सामंजस्य करार **श्री गौतम शांतप्पा, उपाध्यक्ष FMSCI** आणि **FMSCI च्या सुपरक्रॉस रेसिंग कमिशनचे अध्यक्ष श्री. सुजीथ कुमार** यांनी लीगच्या प्रवर्तकांना सुपूर्द केला.

## सुपरक्रॉस खेळाबद्दल

सुपरक्रॉस (SX) हा एक मोटरसायकल रेसिंग स्पोर्ट आहे ज्यामध्ये डर्ट ट्रॅकवर अडथळे असलेल्या विशिष्ट उच्च कामगिरी ऑफ-रोड मोटरसायकलचा समावेश आहे. तसेच यामध्ये काही चित्तथरारक साहसी प्रात्यक्षिकांचा देखील समावेश असतो. हा खेळ यूएस, युरोप आणि ऑस्ट्रेलियामध्ये प्रचंड लोकप्रिय आहे आणि मूळतः तरुण लोकसंख्येला आकर्षित करतो. जागतिक मोटारस्पोर्ट्सची सध्याची अंदाजे बाजारपेठ 5 अब्ज युएस डॉलर इतकी प्रचंड आहे आणि 2027 पर्यंत 6% चक्रवाढ वार्षिक वाढीचा दर (CAGR) वाढून 7.5 अब्ज यूएस डॉलर पर्यंत पोहचण्याची अपेक्षा आहे तसेच याखेळात जागतिक स्तरावर लक्षणीय गुंतवणूक केल्याचे दिसून येत आहे.

भारतातील एक खेळ म्हणून सुपरक्रॉस तरुण, टेकसॅव्ही लोकसंख्येच्या मोठ्या प्रेक्षकांना आकर्षित करेल. तरुण लोकसंख्या, वाढते दरडोई उत्पन्न आणि साहसी खेळांचे थरारक - प्रेरित करणारे स्वरूप, अशा प्रकारच्या पहिल्या चित्तथराक खेळासाठी भारतीय बाजारपेठ सज्ज आहे. नवीन आणि महत्त्वाकांक्षी भारतीयांना साहसाचा थरार आणि खेळाचा उत्साह आवडतो, सुपरक्रॉस हा खेळ भारतीयांसाठी या दोन्ही गोष्टींचे परिपूर्ण मिश्रण ठरेल ह्यात शंकाच नाही.

**या प्रसंगी, फेडरेशन ऑफ मोटर स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (FMSCI) चे उपाध्यक्ष , श्री. गौतम शांतप्पा, म्हणाले. " आम्ही फेडरेशन तर्फे SXI संघाला आमचा पूर्ण पाठिंबा देत आहे आणि ते या अनोख्या खेळाला पुढे घेऊन जातील आणि त्याला एका नवीन स्तरावर नेतील असा आमचा ठाम विश्वास आहे. उपाध्यक्ष म्हणून, मला विश्वास आहे की SXI आणि FMSCI एक संघ म्हणून उत्कृष्ठ काम करतील आणि लीगला प्रचंड यश मिळवून देतील."**

**श्री. सुजीथ कुमार, सुपरक्रॉस/मोटोक्रॉस/दुचाकी रेसिंग कमिशनचे अध्यक्ष, फेडरेशन ऑफ मोटर स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (FMSCI) म्हणाले. "माझा विश्वास आहे की तरुण संघटक खेळात आल्याने भविष्य उज्ज्वल दिसते. मी हे सांगू इच्छितो की माजी -रेसर्सना पुन्हा खेळात वेगवेगळ्या भूमिका साकारताना पाहणे ही अत्यंत आनंदाची बाब आहे. आम्ही फेडरेशन तर्फे SXI संघाला आमचा पूर्ण पाठिंबा देत आहे आणि ते या अनोख्या खेळाला पुढे घेऊन जातील आणि त्याला एका नवीन स्तरावर नेतील असा आमचा ठाम विश्वास आहे."**

**लीगबद्दल त्यांचे विचार शेअर करताना, सुपरक्रॉस इंडिया चे संचालक, श्री. ईशान लोखंडे म्हणाले, "महासंघासोबत लीगचे आयोजन करण्यास आम्ही खरोखर उत्सुक आहोत आणि त्यांनी आमच्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल त्यांचे आभार मानतो. या लीगमुळे भारतातील मोटारस्पोर्ट्स आणि विशेषत: सुपरक्रॉसमध्ये प्रचंड विकास होईल व त्याची लोकप्रियता वाढेल असा आमचा विश्वास आहे. . आम्हाला खात्री आहे की ही लीग, भारतीय प्रेक्षकांचे मनोरंजन करून सुपरक्रॉसला भारतातील एक महत्वपूर्ण खेळ म्हणून मान्यता मिळवून देईल. भविष्यात भारतीय रायडर्सना जागतिक सुपरक्रॉस स्पर्धेच्या व्यासपीठावर एक वेगळी ओळख प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून आम्ही भारताला जगाच्या सुपरक्रॉस नकाशावर अधोरेखित करण्याची योजना आखत आहोत."**

**<u>सुपरक्रॉस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड बद्दल</u>**

सुपरक्रॉस इंडियाचे संस्थापक हे माजी आंतरराष्ट्रीय स्तरावरील रेसर, नॅशनल चॅम्पियन आणि गेल्या **12** वर्षांपासून सुपरक्रॉस इव्हेंटचे आयोजक आहेत ज्यामुळे मजबूत व्यावसायिक दृष्टीकोन, तांत्रिक व ऑपरेशनल माहिती आणि रेसिंगची पार्श्वभूमी आहे. **SXI** ची स्थापना भारतातील सुपरकॉस या खेळाचा प्रचार आणि विकास करण्याच्या एकमेव उद्देशाने करण्यात आली आहे.

**<u>ध्येय</u>**

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रेसर्सच्या सहभागासह भारतात जागतिक दर्जाची सुपरक्रॉस स्पोर्टिंग लीग व्हावी हे संघाचे प्रमुख ध्येय आहे. संघाने भारतातील ब्रँड आधारित सुपरक्रॉस लीगसाठी **FMSCI** सोबत एक विशेष करार केला आहे आणि भारतातील प्रमुख शहरांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या स्पर्धांसह

पॅन-इंडिया लीगसाठी सर्वोच्च संस्थेचा पाठिंबा आहे. आंतरराष्ट्रीय आणि भारतीय  रायडर्ससह **महिला रायडर्सच्या** सहभागास प्रोत्साहन देणे आणि नजीकच्या भविष्यात त्यांचा सहभाग वाढवणे हा मुख्य उद्देश आहे. ही लीग सुपरक्रॉस खेळाचा विकास तळागाळापर्यंत होईल याकडे लक्ष देईल आणि मोटरस्पोर्ट्समध्ये भारताला अग्रेसर बनवण्याचा प्रयत्न करेल.

**<u>संस्थापक</u>**

**वीर पटेल - (वडोदरा)**

· दोन वेळा इंडियन नॅशनल सुपरक्रॉस चॅम्पियन, यूएसए मधील SX वर्ल्ड चॅम्पियन अंतर्गत प्रशिक्षित भारतात राष्ट्रीय सुपरक्रॉस चॅम्पियनशिप जिंकणारा पहिला आणि सर्वात तरुण रेसर. रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी आणि मोटरस्पोर्ट्समध्ये स्वारस्य असलेल्या गुजरातमधील बहु-आयामी  व्यवसाय समूह, लिलेरिया ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक आहेत.

**ईशान लोखंडे - (पुणे)**

· त्यांच्या काळातील भारतातील सर्वोच्च SX रेसर आणि पुणे सुपरक्रॉसचे आयोजक संकल्पक श्री ईशान लोखंडे आंतरराष्ट्रीय मोटोक्रॉस संघाच्या रेसमध्ये सहभाग घेणारे ते पहिले भारतीय आहेत आणि भारतात राष्ट्रीय चॅम्पियनशिप जिंकणाऱ्या पहिल्या खाजगी रेसिंग संघामागील प्रेरणा आहेत तसेच त्यांना मोटोक्रॉसच्या क्षेत्रात अनेक वर्षांचा अनुभव आणि जागतिक संबंध आहेत तसेच यांच्याकडे सुपरक्रॉस इव्हेंट आयोजन करण्याचा एक दशकाहुन अधिक काळाचा अनुभव आहे.

**आश्विन लोखंडे - (पुणे)**

·व्यवसायाने क्रिकेटपटू आणि टेनिस प्रशिक्षक तसेच सुपरकॉस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेचे आधारस्तंभ आहेत. क्रीडा आणि मोटोक्रॉसच्या क्षेत्रात अनेक वर्षांचा अनुभव आणि जागतिक संबंध आहेत तसेच यांच्याकडे सुपरक्रॉस इव्हेंट आयोजन करण्याचा एक दशकाहुन अधिक काळाचा अनुभव आहे ते FIM एशिया रेसचे प्रमाणित अधिकारी देखील आहेत.

अधिकृत सोशल मीडिया लिंक्स:
लीग: "इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीग" – ISRL

- Website: www.indiansupercrossleague.com
- Instagram: @indiansupercrossleague www.instagram.com/indiansupercrossleague/

  Facebook: @indiansupercrossleague www.facebook.com/indiansupercrossleague
- Twitter: ISRL_official www.twitter.com/isrl_official
- You Tube: www.youtube.com/@indiansupercrossleague

**कॉर्पोरेट: सुपरक्रॉस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**

- Website: www.supercrossindia.com
- Instagram: @supercrossindia
- Facebook: @supercrossindia
- Twitter: @supercrossindia
- LinkedIn: Supercross India Pvt. Ltd.

**Email:** pr@supercrossindia.com

**माध्यम संपर्क:**

**Public Relations office:**

**कैवल्य पेठकर - ९९२१४ ४६६९०**

**सलील कुलकर्णी - ९८८१७ ३६२०३**